# महाराष्ट्र शासन

क्रमांक:आस्था-२००६/प्र.क्र.४५/सां.का.४
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १६ सप्टेंबर, २००६

## कार्यालयीन आदेश

सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्रमांक:मातंस/नस्ती/०५/७१, दिनांक १९ एप्रिल, २००५ मधील सूचनेनुसार या विभागातील श्री.स.बा.खंडारे, लघुलेखक निम्नश्रेणी (हिंदी) यांची संगणक समन्वयक म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. श्री.खंडारे यांच्याकडे, सचिव (सां.का.) यांच्या कार्यालयातील कामकाज सांभाळून संगणक समन्वयक या पदाचे अतिरिक्त कामकाज सोपविण्यात येत आहे. सबब त्यांची आस्थापना (सां.का.४) कार्यासनामध्ये पदस्थापना करण्यात येत आहे.

श्री.खंडारे यांचे संगणक समन्वयक म्हणून सर्व साधारण कामे पुढील प्रमाणे असतील :

अ) ई-मंत्रा आज्ञावल्यांची विभागांतर्गत अंमलबजावणी.

ब) शासनाच्या मुख्य वेब-साईट तसेच विभागीय वेब-साईटच्या अद्यावतीकरणासंबंधी सर्व बाबी.

क) विभागाच्या हार्डवेअर संबंधी देखभाल, खरेदी, व्यवस्थापन या सारख्या सर्व बाबी.

ड) विभागाच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रीय कार्यालयांच्या संगणकीकरणाचे समन्वय व संनियंत्रण.

इ) विभागांतर्गत संगणक प्रशिक्षणासंबंधी सर्व बाबी.

फ) विभागा अंतर्गत ई-मेल वापर वाढविण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करणे.

ग) माहिती तंत्रज्ञान संचालनालयामार्फत वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सूचनांनुसार विभागातील संगणकीकरणासंबंधी कार्यवाही करणे.

ह) संगणक समन्वयकाने केलेल्या कामकाजाबाबतची माहिती नियमितपणे दरमहा विभागाच्या सचिवांकडे सादर करणे.

(ना.शि.भोगे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, सामान्य प्रशासन विभाग, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई-३२
सचिव, (प. व सां.का.) यांचे स्वीय सहाय्यक
उप सचिव (सां.का.), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
उप सचिव (पर्यटन), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
श्री.स.बा.खंडारे, लघुलेखक निम्नश्रेणी (हिंदी), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
पर्यटव व सांस्कृतिक कार्य विभागातील सर्व कार्यासने.
निवड नस्ती/सां.का.४